# प्रेसनोट

दि.२१/१२/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर गु.र.नं.१३२/२०१७ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | ज्योती दत्तात्रय डफळ, लिपीक, वर्ग–३, भुमी अभिलेख कार्यालय नगर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १०,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये १०,०००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, आरोपी लोकसेविका ज्योती दत्तात्रय डफळ, लिपीक, वर्ग–३, भुमी अभिलेख कार्यालय नगर, जि.अहमदनगर यांनी तक्रारदार यांचे वडीलांचे व चुलत्यांचे नांवे मौजे खारे कर्जुने, ता.नगर येथील वडीलोपार्जित गट नं.२३ मध्ये ३ हेक्टर ४४ आर जमीनीची मोजणी करुन नकाशा दिले बददल व जमीनीवर नकाशा प्रमाणे हिश्यावार निशाणी करुन देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे दि.२१/७/२०१७ रोजी पंचासमक्ष १०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम पंचांसमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडले होते. त्यांच्याविरुध्द कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर येथे दि. २१/७/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>सदर सापळा कारवाई श्याम पवरे, तत्कालीन पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहमदनगर यांनी केली होती व त्यांनी गुन्हयाचा तपास पूर्ण करुन मा.विशेष न्यायालय, अहमदनगर येथे नमुद आरोपीविरुध्द दि.६/१/२०१८ रोजी दोषारोपपत्र दाखल केले होते.<br>सदर खटल्याची सुनावणी मा.श्री.सुधाकर वें. यार्लगड्डा, प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे समोर होऊन पोलीसांनी केलेला चांगला तपास व महत्वाच्या साक्षीच्या आधारे मा.न्यायालयाने आरोपी लोकसेविका ज्योती दत्तात्रय डफळ यांना आज दि. २१/१२/२०२१ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ व कलम १३(२) प्रमाणे दोषी ठरवून ४ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व २०,०००/– रुपये दंड तसेच दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.<br>सदर खटल्याचे सरकार पक्षातर्फे ॲड.अर्जुन पवार, सहायक सरकारी अभियोक्ता, अहमदनगर यांनी काम पाहिले असून त्यांना मपोना.संध्या म्हस्के यांनी मदत केली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in
ई–मेल ऑनलाईन तक्रार :– acbwebmail@mahapolice.gov.in
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७
व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर